RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १५१(३)] शुक्रवार, ऑक्टोबर १७, २०२५/आश्विन २५, शके १९४७ [पृष्ठे ३ , किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८७**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक प्राफेब-२०२५/प्र.क्र.१७/पुनर्रचना.– महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४ पोट-कलम (१) च्या खंड (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने जी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केले आहे, त्या अधिसूचनेचा पुढील मसुदा उक्त कलम ४ च्या पोट कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, त्याद्वारे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त मसुदा विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना विभागीय आयुक्त, नागपूर, विभागीय आयुक्त कार्यालय, जुने सचिवालय, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१ यांच्याकडे उपरोक्त तारखेस किंवा त्यापूर्वी येतील त्या शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### अधिसूचनेचा मसुदा

क्रमांक प्राफेब-२०२५/प्र.क्र.१७/पुनर्रचना.– महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एक्केचाळीस) कलम ४ पोट-कलम (१) च्या खंड (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या तसेच याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि पूर्वीच्या सर्व अधिसूचना किंवा आदेश किंवा नागपूर जिल्ह्याच्या मौदा तालुक्यात समाविष्ट असलेल्या

मौ. नंदापूरी या गावाचे जेथवर संबंधित असतील तेथवर त्यामध्ये फेरबदल करून महाराष्ट्र शासन पुर्वीच्या अधिसूचना किंवा आदेशात अंशतः बदल करून उक्त अधिनियमाच्या कलम-४ च्या पोट कलम (४) नुसार आवश्यक पूर्व प्रसिद्धीनंतर नागपूर जिल्ह्यातील मौदा व रामटेक तालुक्यांच्या चतुःसीमांमध्ये फेरबदल करून दिनांक १७ नोव्हेंबर,२०२५ पासून खालील अनुसूचीतील गाव नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातून वगळण्यात येईल आणि नागपूर जिल्ह्याच्या रामटेक तालुक्यात समाविष्ट करण्यात येईल, असे विनिर्दिष्ट करीत आहे.

**अनुसूची**

| **अ. क्र.** | **गावांचे नाव** | **सदर अधिसूचना निर्गमित करण्यापूर्वीचा स्तंभ (२) मधील गावांचा तालुका व जिल्हा** | **सदर अधिसूचना निर्गमित केल्यानंतरचा स्तंभ (२) मधील गावांचा तालुका व जिल्हा** |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | नंदापुरी | तालुका – मौदा<br>जिल्हा – नागपूर | तालुका – रामटेक<br>जिल्हा – नागपूर |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित देशमुख,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400032, Date 17th October, 2025

### *NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No.PRAFEB-2025/C.R.17/restructre.– The following draft of the notification, which the Government of Maharashtra proposes to issue in exercise of the powers conferred by clauses *(iv)* and *(vi)* of sub-section *(1)* of section 4 of the Maharashtra Land Revenue Code,1966 (Mah. XLI of 1966), is hereby published as required by sub-section *(4)* of the said section 4, for the information of all the persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government on or after the 17th November, 2025

2. Any objections or suggestions, which may be received by the Divisional Commissionar, Nagpur Division, Old Sachivalay, Civil Lines, Nagpur 440 001, from any person with respect to the said draft notification before the aforesaid date will be considered by Government.

### *DRAFT NOTIFICATION*

No. PRAFEB-2025/C.R.17/ restructre.–In exercise of the powers conferred by clauses (*iv*) and (*vi*) of sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), and of all other powers enabling it in this behalf, and in partial modification of any previous Notifications or Orders issued in this behalf, in so far as the same relate to the village specified in the Schedule appended hereto, the Government of Maharashtra, after previous publication, as required by sub-section (*4*) of the said section 4, hereby alters, with effect from 17th November, 2025 the limits of Mouda Taluka and Ramtek Taluka of the Nagpur District, by excluding the village mentioned in the Schedule from Mauda Taluka of the Nagpur District and including it in Ramtek Taluka of the Nagpur District.

*Schedule*

| Sr. No. | Name of Village | Name of Taluka and District of Village in Column No.2 prior to issue of this notification | Name of Taluka and District of Village in Column No.2 after issue of this notification |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1. | Nandapuri | Taluka- Mouda District- Nagpur | Taluka- Ramtek District- Nagpur |

By order and in the name of Governor of Maharashtra,

AJIT DESHMUKH,
Joint Sectretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.